**"डिसेंबर २०१६" या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती...**

## (अ) शासन निर्णय / अधिसूचना

- कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणाऱ्या लैंगिक छळाच्या तक्रारीची चौकीश करण्यासाठी स्थापित असलेल्या विभागीय समितीच्या अध्यक्षपदी उपसचिव श्रीमती शु.सु.आगाशे यांची दिनांक १ डिसेंबर २०१६ च्या शासन निर्णयान्वये नियुक्ती करण्यात आली आहे.
- मंत्रालयाव्यतिरिक्त इतर शासकीय कार्यालयांनी / प्राधिकरणांनी लोक आयुक्त व उपलोक आयुक्त कार्यालय, मुंबई यांच्याकडून ई-मेलव्दारे केल्या जाणाऱ्या पत्रव्यवहारांवर विहित मुदतीत कार्यवाही करण्याच्या सूचना दिनांक ७ डिसेंबर २०१६ च्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत.
- लिपिक-टंकलेखक (मराठी / इंग्रजी) परीक्षा २०१५ अंतर्गत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या उमेदवारांचे बृहन्मुंबईतील राज्य शासनाच्या विविध कार्यालयातील लिपिक-टंकलेखक पदावर दिनांक २९ सप्टेंबर २०१६ च्या शासन ज्ञापनान्वये नियतवाटप करण्यात आले होते. परंतु ७८ उमेदवारांच्या नियतवाटप केलेल्या कार्यालयांमध्ये प्रशासकीय कारणास्तव बदल करुन, दिनांक ९ डिसेंबर २०१६ च्या शासन ज्ञापनान्वये पुनर्नियतवाटप करण्यात आले आहे.
- दिनांक १७ डिसेंबर २०१६ च्या शासन परिपत्रकान्वये महाराष्ट्र राज्य संवर्गातील भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांना सन २०१६ ची वार्षिक अचल मालमत्ता विवरणपत्रे दिनांक ३१ जानेवारी २०१७ पर्यंत सादर करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.
- दिनांक १७ डिसेंबर २०१६ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभाग व त्यांच्या अधिनस्त कार्यालयातील विविध विषयांसंदर्भात विवक्षित सेवा / कामांसाठी विषयनिहाय एमपॅनलमेंट करुन शासकीय / निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पद्धतीने घेण्यासाठी कार्यपद्धती विहित केली आहे.
- दिनांक १७ डिसेंबर २०१६ च्या शासन निर्णयान्वये शासकीय अधिकारी / कर्मचारी यांच्या प्रतिनयुक्तीने नियुक्तीचे धोरण, त्यासंदर्भातील अटी व शर्ती आणि नियुक्तीची कार्यपद्धती विहित केली आहे.
- दिनांक २१ डिसेंबर २०१६ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील गट-ड संवर्गातील मंजूर असलेल्या पदांपैकी २५% पदे म्हणजे १० पदे निरसित करण्यात आली आहेत.
- केंद्र शासनाच्या कार्मिक व प्रशिक्षण विभाग, नवी दिल्ली यांच्या कार्यालयीन ज्ञापन क्रमांक-४०७/१६/२०१६-एव्हीडी-आयव्ही (एलपी), दिनांक १ डिसेंबर २०१६ अन्वये लोकपाल व लोकायुक्त (सुधारणा) अधिनियम २०१६ पारित झाल्याने व लोकसेवक (मत्ता व दायित्वांचे वार्षिक विवरणपत्र सादर करणे व विवरणपत्रे दाखल करण्यामधून सूट देण्यासाठी मत्त्यांची मर्यादा) नियम २०१४ मधील कलम-४४ मध्ये नवीन तरतूद करण्यात आल्याने, लोकपाल व लोकायुक्त (सुधारणा) अधिनियम २०१४ व त्यातील सुधारणा निरसित करण्यात आल्या आहेत. यामुळे लोकसेवक (मत्ता व ........ मर्यादा) नियम २०१४ नुसार राज्यातील भारतीय प्रशासन सेवेतील सर्व अधिकाऱ्यांनी मत्ता व दायित्वांची विवरणपत्रे सद्य:स्थितीत सादर करणे आवश्यक नाही. आता लोकपाल व लोकायुक्त अधिनियम २०१६ मधील सुधारित तरतुदीनुसार विहित नमुना, पद्धत व कालावधीबाबत केंद्र शासनाकडून सूचना प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार राज्यातील भारतीय प्रशासन सेवेतील सर्व अधिकाऱ्यांनी मत्ता व दायित्त्वाची विवरणपत्र सादर करणे आवश्यक असल्याच्या सूचना दिनांक २६ डिसेंबर २०१६ च्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत.
- दिनांक २७ डिसेंबर २०१६ च्या शासन निर्णयान्वये प्रतिनियुक्ती धोरणाच्या अंमलबजावणीसंदर्भात येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी शासनास शिफारस करण्यासाठी मा.मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती गठित करण्यात आली आहे.
- दिनांक २८ डिसेंबर २०१६ च्या शासन परिपत्रकान्वये "सहायक कक्ष अधिकारी सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा २०१६" चा निकाल जाहिर करण्यात आला आहे.

- महाराष्ट्र राज्य संवर्गातील भारतीय प्रशासन अधिकाऱ्यांनी त्यांची सन २०१६ ची वार्षिक अचल मालमत्ता विवरणपत्रे (IPR) Online पद्धतीने विहित केलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब करुन सादर करण्याच्या सूचना दिनांक ३० डिसेंबर २०१६ च्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत.

- यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे या संस्थेच्या प्रोजेक्ट मॅनेजमेंट इमारतीच्या बांधकामाकरिता रु.७.१७ कोटी एवढया रकमेच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेत, आतापर्यंत वितरित केलेले रु.५.९६ कोटी इतका निधी वगळून, आता अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर योजनांतर्गत खर्चासाठी उपलब्ध असलेल्या निधीतून २०७०००७६ या लेखाशीर्षाखालील ३१-सहायक अनुदान (वेतनेतर) या उद्दिष्टांतर्गत एकूण रु.९६.८० लाख इतका निधी दिनांक १९ डिसेंबर २०१६ च्या शासन निर्णयान्वये वितरित करण्यास मंजूरी देण्यात आली आहे.

- दिनांक २३ डिसेंबर २०१६ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखालील मंत्रालय आहार / उपाहारगृहातील खाद्यपदार्थ, भोजनथाळी व पेयांच्या दरांचे पुनर्विलोकन करुन नव्याने दर निश्चित करण्यासाठी सहसचिव (उपाहारगृह), सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे.

- मानव संसाधन व्यवस्थापन प्रणाली (Human Resource Management System) हा ई-प्रशासन प्रकल्प राबविण्यासाठी सेवाविषयक बाबींचा प्रचलित कार्यपद्धतीनुसार अभ्यास करुन सल्लागार संस्थेस तसेच विभागास मार्गदर्शन करण्यासाठी श्री.सुरेश कुमार, सेवानिवृत्त भाप्रसे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयीन उपसचिवांची कोअर समिती दिनां ३१ डिसेंबर २०१६ च्या शासन परिपत्रकान्वये गठित करण्यात आली आहे.

### (ब) <u>प्रशिक्षण</u>

- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राज्यसेवा परीक्षेव्दारे सरळसेवेने नियुक्त होणाऱ्या गट-अ व गट-ब मधील अधिकाऱ्यांच्या एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमाबाबत दिनांक ९ मे २०१४ च्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्या शासन निर्णयातील परिच्छेद-२(i) मधील तरतुदीमध्ये दिनांक ६ डिसेंबर २०१६ च्या शासन शुद्धीपत्रकान्वये सुधारणा (शुद्धीपत्र) करण्यात आली आहे.

### (क) <u>पदोन्नती / निवडसूची / ज्येष्ठतासूची</u>

- मंत्रालय आहार / उपाहारगृहाच्या आस्थापनेवरील व्यवस्थापकीय बाजूच्या गट-ब व गट-क संवर्गातील अधिकारी / कर्मचाऱ्यांची दिनांक १ जानेवारी २०१३ ते १ जानेवारी २०१६ ची स्थिती दर्शविणारी अंतिम सामाईक ज्येष्ठतासूची दिनांक ३ डिसेंबर २०१६ च्या शासन परिपत्रकान्वये प्रसिद्ध करण्यात आली आहे.

- गट-ड (शिपाई) संवर्गातील १२ कर्मचाऱ्यांना गट-क संवर्गातील लिपिक-टंकलेखक पदावर नियमित पदोन्नती देण्यात आली आहे.

- सहायक कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी अर्हता प्राप्त करणाऱ्या मंत्रालयीन विभागातील लिपिक, लिपिक-टंकलेखक व टंकलेखकांची दिनांक १ जानेवारी २०१६ ची स्थिती दर्शविणारी तात्पुरती ज्येष्ठतासूची दिनांक २३ डिसेंबर २०१६ च्या शासन परिपत्रकान्वये प्रसिद्ध करण्यात आली आहे.

- मंत्रालयीन विभागातील उपसचिवांची दिनांक १ जानेवारी २०१२ ची अंतिम तसेच दिनांक १ जानेवारी २०१३ व १ जानेवारी २०१४ रोजी तात्पुरती सामाईक ज्येष्ठतासूची दिनांक ३० डिसेंबर २०१६ च्या शासन परिपत्रकान्वये प्रसिद्ध करण्यात आली आहे.

- एका उपसचिवाला पदोन्नतीचा मानीव दिनांक मंजूर करण्यात आला आहे.

### (ड) <u>बदल्या / पदस्थापना</u>

- भारतीय प्रशासन सेवेतील १, ९, ८ अशा १८ अधिकाऱ्यांच्या दिनांक २, ९ व २८ डिसेंबर २०१६ च्या शासन निर्णयान्वये बदल्या / पदस्थापना करण्यात आल्या आहेत. एका अधिकाऱ्याची बदली स्थगित करण्यात आली.

- एका अवर सचिवाची बदली करण्यात आली आहे. सहायक कक्ष अधिकारी संवर्गातील एका कर्मचाऱ्याची बदली स्थगित करण्यात आली. उपसचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी या संवर्गातील अनुक्रमे २, १, १ अशा ४ अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीने पदस्थापना करण्यात आल्या आहेत.
- दिनांक २१ डिसेंबर २०१६ च्या शासन आदेशान्वये उपसचिव संवर्गातील २० अधिकाऱ्यांना पदोन्नतीचे नियमित दिनांक मंजूर करण्यात आले.

***********